ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# खराशीच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वेगळेपण

**श्रीमती मंदा प्रकाश उमाठे (वंजारी)**
मुख्याध्यापिका,
स्व. प्रकाशभाऊ उमाठे विद्यालय, नागपूर.

**प्रा. डॉ. रेणू बायस्कर सदार**
सहायक प्राध्यापिका, पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभाग,
रातुम नागपूर विद्या. नागपूर

★★★

प्राथमिक शाळा त्यातल्या त्यात जिल्हा परिशदेची प्राथमिक शाळा म्हटल्याबरोबर आपल्या डोळ्यापुढे एक चित्र उभे राहते. एका रांगेत शाळेच्या खोल्या, त्यासमोर पटांगण अन् या सर्वाचे भोवती असतीलच तर एक संरक्षक भित. पण नुसत्या खोल्या, पटांगण अन् संरक्षक भिंत यानी षाळा घडत नसते तर ती शाळेशी संबंधीत प्रत्येक घटकाच्या सहकार्याने, सहभागाने घडते. नुसती घडतेच असे नव्हे तर नावा पालाही येते आणि पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. असाच काहीसा अनुभव खराशीच्या प्राथमिक शाळेला भेट दिल्यावर आला.

**उद्दिष्ट :–** प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी आणि शाळा प्रगत करण्यासाठी खराशीच्या जि.प. प्राथमिक शाळेने केलेल्या कार्यक्रम, उपक्रम आणि प्रयासांचे मूल्यमापन करणे तसेच विद्यार्थी, षाळा आणि शिक्षकांच्या गुणवत्तेमध्ये झालेल्या परिणामांची चिकित्सक पाहणी करणे हे या शाळा भेटीचे प्रमुख उद्देश होते. खराशीची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शासनाने प्रशंसलेली अन् त्यामुळेच शाळेला भेट दद्यावी ही उत्सुकता मनी बाळगुन आमच्या शाळेतील शिक्षकांनाही हा आगळावेगळा अनुभव घेता यावा म्हणून पुढाकार घेऊन एक सहलीच्या रूपात क्षेत्रभेट आयोजिली. शाळेत बुधवार हा दिवस अभ्यासगतांचा दिवस (भेटणाऱ्यांचा), पाहुण्यांचा दिवस असतो हे माहिती असल्याने बुधवार, दि. 09.01.2019 हा दिवस निश्चित केला. खराशी हे खेडे भंडारा जिल्हयात साकोली तहसीलीत साधारणतः 700 ते 800 लोकवस्तीचे गाव. पण सर्व गावकऱ्यांना अभिमान वाटावा असे नेत्रदीपक कार्य या शाळेने सर्वाच्या सहकार्याने, सहभागाने करून शाळेचा नावलौकिक शासनदरबारी नोंदविला. काय केले असेल या शाळेने? त्यातील प्रत्येक मानवी घटकाने? या उत्सुकतेपोटी आणि आपली ज्ञानेंद्रिये जागरूक ठेवून बुधवार, दि. 09.01.2019 रोजी शाळेला भेट दिली. आणि एका वेगळ्याच दुनियेत आलोत, जादूच्या ठिकाणी आलोत असा आभास झाला. शाळेच्या प्रवेशद्वारापाशी बस थांबली. बस मधून उतरून शाळेच्या प्रवेशाद्वारापाशी पोहचताच 4 ते 5 विद्यार्थानी गुड मॉर्निंग मॅडमगुड मॉर्निंग सर म्हणून आमचे स्वागत केले. आत शिरताच प्रामुख्याने जाणवली ती शाळेतील स्वच्छता अन् शिस्त. शाळेतल्या प्रत्येक विद्यार्थ्यांचा गणवेश नीटनेटका, स्वच्छ अन् पूर्ण होता. आपल्या गणवेशाविषयीचा अभिमान प्रत्येक विद्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावर दिसत होता. त्याच बरोबर प्रत्येक विद्यार्थ्याच्या वागण्यात सहजता होती. शाळेच्या आवारात ध्वनिक्षेपकावरून कोणी तरी विद्यार्थ्यांना संबोधून बोलत होते. परिचयानंतर लक्षात आले की, आवाज शाळेच्या मुख्याध्यापक गुरूजी मुबारक अली सय्यद सरांचा.

**संचयनी :–** डाव्या बाजूला 8–10 विद्यार्थी, विद्यार्थीनी (मॉनिटर) रांगेत उभे होते. त्यांच्या पुढ्यातील रांगेत विद्यार्थी, विद्यार्थींनी वर्गवार, शिस्तीने उभे राहून आपल्याला आपल्या गंगाजळीत खाऊचे किती पैसे टाकायचे ते त्या समुह प्रमुखाला (ग्रष्प लिडर) सांगुन देत होते. जे विद्यार्थी, विद्यार्थीनी पैसे घेत होते ते प्रत्येकाला विचारत होते. "How much money do you want to deposit in your account today?" अन् मिळालेल्या उत्तरानुसार पैसे खात्यात जमा करून उरलेले पैसे परत करत होते. चौकशी अंती कळले की, षाळा "संचयनी" प्रकल्प राबविते. या प्रकल्पाद्वारे मुले, मुली आपल्या खाऊचे पैसे आपल्या खात्यात जमा करतात. त्याचा प्रत्येक मुलाचा हिशोब लिहिला जातो. यामुळे मुलांना बचतीची सवय तर लागतेच, शिवाय बचतीचे महत्व कळते आणि बँकेत पैशाची देवाण–घेवाण कशी चालते याचेही ज्ञान मिळते. शिवाय प्रत्येकाला मॉनिटर बनण्याची संधी मिळते. अशा पद्धतीने रोज जमलेली रक्कम आठवड्याच्या शेवटी एकूण जमलेली रक्कम विद्यार्थ्यांना कळते. हे सर्व पैसे दर शनिवारी शाळेच्या पोस्टातील खात्यात जमा होतात. जेणे करून विद्यार्थ्याना जमलेल्या रकमेवर व्याजही मिळेल. सातत्याने व सचोटीने राबविलेल्या या संचयनीमुळे आज शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या खात्यात रूपये 10,000 / – ते 12,000 / – रक्कम जमा आहे. याच रकमेतून पुढे विद्यार्थी शैक्षणिक साधन म्हणून Android Mobile घेतात. पालकांचे तर हे स्वप्न आहे की, या रकमेतून मुलांना विमानाने मुंबई दर्शन करून आणावे. "केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे कृकृ" याचा प्रत्यय पावलोपावली येत होता. संचयनीचे काम संपता संपता माईकवरून एक सूचना आली. आपआपली कामे आवरून पुढील पाच मिनीटात मुले परिपाठ (Assembly) साठी शिस्तीने आवाज, गोंधळ, गडबड न करता पटांगणात हजर झाली. त्यावेळी जाणवले की, शाळेत घंटा नाही. Bell-less घंटाविना शाळा असूनही सर्व कामे वेळेच्या आत आणि शिस्तबद्ध पद्धतीने होतांना पाहून खूप कौतूक वाटले.

**परिपाठ :–** प्रत्येकच शाळेत दिनचर्येचा भाग म्हणून परिपाठ घेतला जातो. पण या जिल्हा परिशदेच्या शाळेतील परिपाठ एकदम वेगळा असल्याचे जाणवले. मुलांचे शिस्तबद्ध पद्धतीने पटांगणात येऊन रांगेत उभे राहणे. रांगा आपसूकच तयार व्हाव्यात म्हणून पटांगणात कायम रंगविलेले गोलाकार, त्या गोलातच मुले उभी होत असल्याने आडवी, उभी, तिरपी कसेही बघितले तरी रांग सरळच दिसत होती. एका मिनीटात सर्व शिस्तीने उभे झाले. समोर डाव्या बाजूला उभ्या असलेल्या दुसरी, तिसरीच्या 4 मुलांच्या पथकाने वादद्ये वाजवायला सुरुवात केली. त्या वाद्यांच्या सुरात सर्वांनी सामुहिक राष्ट्रगीत

म्हटले. त्यापाठोपाठ प्रतिज्ञा आणि भारताचे संविधान झाल्या बरोबर "जय हिन्द" आणि "जय जवान– जय किसान" अषा विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या. यानंतर लगेच मुख्याध्यापकांनी आज Visitor's Day आहे त्यामुळे शाळेला भेट दयायला कोण कोण आलेत ते सांगितले व परिपाठ कसा होणार त्याची पाहुण्यांना कल्पना दिली. परिपाठाचे हेच स्वरूप दररोज (Visitors असो अथवा नसो) असेच असते हेही नमूद केले. आम्ही शाळेला भेट दिली त्या दिवशी दुसऱ्या वर्गातील मुले, मुली इंग्रजीतून परिपाठ घेत होती. प्रत्येक विद्यार्थी स्वतःची ओळख करून देतांना स्वतःच्या नावाच्या आद्याक्षराने सुरू होणारे इंग्रजी विशेषण लावून स्वतःचा परिचय करून देत होता. उदा. Respectful Rutuja, Pretty Prachi etc. अशाप्रकारे परिपाठ घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चमूने स्वतःचा आगळावेगळा परिचय आम्हा सर्वांना करून दिला. त्यानंतर एकीने संचलन केले, दुसरीने त्या दिवसाच्या ठळक बातम्या सांगितल्या, तिसरीने तारखेनुसार त्या दिवशी 9 तारीख असल्याने सर्वांना सामुहिक 9 चा पाढा म्हणायला सांगितला. सर्वांकडुन 9 चा पाढा म्हणून घेण्याचा मुख्य उद्देष प्रत्येक दिवसाची तारीख विद्यार्थ्यांच्या लक्षात राहावी आणि पाढे पाठ व्हावे. त्यामुळे परिपाठात गणिताचाही अंतर्भाव झाला. पाहुण्यांची ओळख सांगतांना पाहुणे नागपूरचे आहेत म्हणून मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना नागपूरचे महत्व विचारले. प्रश्न सर्वांना उद्देशून विचारल्याने 5–7 विद्यार्थ्यांनी एकदम पण निरनिराळी उत्तरे दिली. नागपूर मोठे शहर आहे, नागपूर संत्र्यासाठी प्रसिद्ध आहे, नागपूला मेट्रो रेल्वे तयार होत आहे, नागपूरला महाराजबाग, अजब बंगला आहे इत्यादी उत्तरे पुढे आल्याने पाहुण्यांनाही विद्यार्थ्यांचे खूप कौतूक वाटले. त्यानंतर विद्यार्थ्याने दिनविषेश सांगितले. 9 जानेवारी हा दिवस कोणत्या कारणामुळे विषेश आहे, या दिवशी कोणाची जयंती/पुण्यतिथी आहे, मग या व्यक्तिंची वैशिष्ट्ये काय? अशासारख्या प्रष्नांचा समावेश होता. 9 जानेवारी 1922 हा हर गोविंद खुराना यांचा जन्म दिवस. मग खुराना कोण? कशासाठी प्रसिद्ध? त्यांना नोबेल पुरस्कार कोणत्या संशोधनासाठी मिळाला? मग नोबेल पुरस्कार कोणी जाहिर केला? कोणत्या देशा तर्फे ? कोणत्या कामगिरीसाठी ? कोणत्या क्षेत्रातील कामगिरी? या वर्षीचा पुरस्कार कोणाला मिळाला? भारताला नोबेल पुरस्कार केव्हा मिळाले? आतापर्यंत किती भारतीयांना नोबेल पुरस्कार मिळाले? रमण मॅगसेस पुरस्कार कोणत्या देशाद्वारे दिला जातो? कोणत्या भारतीयांना आता पर्यंत रमण मॅगसेस पुरस्कार मिळाला? विदर्भातील कोणत्या कुटूंबातील तीन व्यक्तींना रमण मॅगसेस पुरस्कार मिळाला? कोणत्या कामगिरीसाठी? मग भारताद्वारे कोणते पुरस्कार दिले जातात? मग कोणत्या राष्ट्रपतींना भारतरत्न पुरस्कार मिळाले? मग सलग सगळ्या 15 राष्ट्रपतींची नावे, पंतप्रधानांची नावे, भारताचे इतर पुरस्कार कोणते? पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, शौर्यचक्र, अशोकचक्र, खेलरत्न, मग राष्ट्रीय क्रिडा दिन केव्हा? ध्यानचंद पुरस्कार, साहित्यातील पुरस्कार, ज्ञानपीठ पुरस्कार, साहित्यासाठी सर्व प्रथम कोणाला मिळाला? महाराष्ट्रातून कोणाला? अशी चौफेर प्रश्नांची उधळण मुख्याध्यापक करीत होते आणि उत्तरासाठी सर्व विद्यार्थ्यांचे हात वर प्रत्येकाला प्रत्येक प्रश्नाचे उत्तर माहित होते. सर मी असा प्रतिसाद विद्यार्थी देत होते. मुख्याध्यापक मधूनच कोणालाही उत्तर देण्याची संधी देत होते. कधी पहिल्या, दुसऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांना उत्तरे विचारली जात होती. पहिली, दुसरीतील चिमुकलेही अगदी बरोबर उत्तर देत होते. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना ज्या भाषेत प्रश्न विचारले जात त्याच भाषेत विद्यार्थी पटकन उत्तर देत होते. त्यानंतरच्या विद्यार्थीनीने दिवसाचा नवा शब्द सांगितला. त्यापासून इंग्रजी वाक्य तयार करायला सांगितले. त्या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द विचारला. विद्यार्थीही तरबेज! एका शब्दावरून अनेक शब्द सांगत गेले. विद्यार्थ्यांची शब्द संपदा Vocabulary समृद्ध व्हावी हा त्यामागचा मुळ उद्देश. मग कोणाचे काय चुकले? उच्चारण चुकले की ग्रामर? अशी चिकित्सा करायला लावली. शब्दसंपदा समृद्ध करण्याचा छोटासा प्रयत्न, प्रयोग! पण नित्यनेमाने परिपाठाचा भाग म्हणून अंतर्भूत झाल्याने इतक्या कमी वेळात (2–3 वर्षात) सर्व विद्यार्थ्यांची शब्दसंपदा समृद्ध झालेली दिसली. अतिशय स्तुत्य उपक्रम, प्रयत्न तेवढेच प्रमाणिक! मग 9 तारखेनंतर जानेवारीत येणारी 14 तारीख कशासाठी प्रसिद्ध? मकर संक्रमण म्हणजे काय? मग इतर राशी कोणत्या? नक्षत्रे किती व कोणती? ग्रह किती? कोणते? मग जागतिक खगोल दिन केव्हा? या आणि अशा प्रष्नांची उत्तरे केवळ पोपटपंची नसून मुलांचे सामान्यज्ञान खरोखरच समृद्ध आहे याचा प्रत्यय पाहुण्यांना यावा म्हणून इतरही काही प्रश्न मुख्याध्यापकांनी विचारले. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, नुकतीच चार राज्यात पार पडलेली निवडणूक, नविन मुख्यमंत्री अशासारखे चालू घडामोडीवरील अनेक प्रश्न विचारल्यावर तीही माहिती विद्यार्थ्यांनी अचूक आणि तप्तरतेने सांगितली. मुख्याध्यापक, शिक्षकांची त्यामागची मेहनत आणि विद्यार्थ्यांची तयारी पाहून आश्चर्य आणि कौतुक वाटले.

नंतरच्या विद्यार्थीनीने सुविचार सांगितला. सुविचार इंग्रजीतून होता. "School is a temple of knowledge" मग Temple म्हणजे काय? मग हिंदूच्या प्रार्थनास्थळाला काय म्हणतात? देवळात आपण कशासाठी जातो? प्रार्थना करण्यासाठी. काय प्रार्थना करतो? सुखी ठेव म्हणतो. मग शाळा हे देवस्थान तर इथले गुरूजी देव! गुरूजींना देव का मानायचे? नवनविन ज्ञान मिळते, वाईट सवयी दूर होऊन चांगल्या सवयी लागतात. समाजातील वाईट गोष्टी कोणत्या? त्या कशा नाहीशा करायच्या? त्यातुनच पुढे सावित्रीबाई फुले, विनोबा, तुकडोजी महाराजांची सामाजिक कार्ये यांचा अंतर्भाव करून मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले. अन् विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे उत्तरे दिली. त्याच बरोबर ओघाने आलेली संत गाडगेबाबांची कथा! "खर्चु नको देवासाठी, पैसा शिक्षणाले लावा," सावित्रीबाईंनी केलेले स्त्री शिक्षणासाठीचे प्रयत्न, विद्यार्थ्यांचे आपल्या सभोवतालच्या समाजाचे असलेले भान, व्यसनाचे दुष्परिणाम, व्यसनमुक्तीसाठी विद्यार्थ्यांनी केलेले प्रयत्न, त्यांचे अनुभव झाडांनाही संवेदना असतात हा जगदीशचंद्र बोस यांनी दिलेला विचार, महात्मा गांधींचे आफ्रिकेतून परत येणे या सर्व विषयांवरील प्रश्नोत्तरांची शहानिशा परिपाठात झाली.

**मुख्याध्यापकांसोबत चर्चा** :– अशा या आगळ्यावेगळ्या शाळेतील नाविन्यपूर्ण परिपाठ पाहून, चेहऱ्यावरचे आश्चर्य अजून ओसरलेलेही नसतांना मुख्याध्यापकांनी चर्चेसाठी पाहुण्यांना वेळ दिला आहे हे कळताच सर्व Visitors तल्लीनतेने मुख्याध्यापकांचे बोलणे, निरनिराळ्या प्रश्नांना दिलेली उत्तरे काळजीपूर्वक ऐकू लागले. शाळेचे मुख्याध्यापक मुबारक अली सैय्यद सर प्रत्येक प्रश्नाचे अनुभवाधारित उत्तर देवू लागले. शारिरिक, मानसिक, भावनिक तसेच बौद्धिक संतुलनाचे अजब रसायन या मुख्याध्यापकांच्या व्यक्तिमत्वातून जाणवत होते. चर्चे दरम्यान कमीत कमी प्रश्न विचारुन माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला.

**1) सुरूवात कुठून, कशी झाली** – प्रश्नाच्या उत्तरादाखल सरांनी थोडा पूर्वार्ध, पुर्वानुभव कथन केला. खराशीपूर्वी आधी 2–3 वर्षे त्यांनी एका शाळेत शिक्षकाची नोकरी केली. डोक्यातील नवनव्या कल्पना त्यांनी मुख्याध्यापकासमोर मांडल्या. पण नवे रक्त, आपल्यापेक्षा वरचढ ठरतेय हे पाहून वरिष्ठांनी त्यांना त्रास दयायला सुरुवात केली. त्यामुळे त्यांनी आपल्या बदलीसाठी प्रयत्न केले. खराशीचे मुख्याध्यापक नुकतेच निवृत्त झाल्याने ही आडगावातील दोन शिक्षकी शाळा त्यांच्या पदरात पडली. शाळेचे रूप, विद्यार्थी संख्या, जुन्या मुख्याध्यापकांची कारकीर्द त्यांची गावात पसरलेली माहिती, प्रतिष्ठा हे सगळे बघताक्षणीच लक्षात आले की इथे शुन्यापासून सुरूवात करावी लागेल, जुन्या, बुरसटलेल्या कृती, वृत्ती–विचारांचा झाडणीने जाळे काढुन स्वच्छ करावे तसे मुळापासून प्रयत्न करावे लागतील. त्याबरोबरच घरची जबाबदारीही वाढली होती. पत्नीसोबत एका चिमुकलीची जबाबदारी एक सक्षम पिता म्हणून आली होती. तीही आता लवकरच षाळेत जाण्याच्या वयाची होणार होती. आपल्या मुलीला खराशीच्याच शाळेत शिकवायचे. मग तिला जे जे शिक्षण देणे शक्य असेल, गरजेचे असेल ते ते सर्व शिक्षण दयायचे. मग तिच्याबरोबर गावातील आणखी मुले आली तर त्यांनाही तसेच शिकवायचे. या दृष्टीने प्रयत्न सुरु केले. सुरूवातीला सहाय्यक शिक्षकांसोबत घरोघरी जावून प्रत्येक घरातील आई–वडिलांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. जुन्या 'मास्तर' ने काय केले होते किंवा नव्हते याचा पाढा ऐकावा लागला. त्या पालकांच्या गैरसमजुती पुसून त्यांच्या मुलांना शाळेत पाठविण्याविषयी कित्येकदा विनवण्या कराव्या लागल्या. शाळेचे, शिकवण्याचे, अभ्यासाचे महत्व पटवून देत असतांनाच सरकारी प्रयत्न व मदतीची माहिती दिली. परिणामी, महिन्याभरात विद्यार्थी संख्या वाढली. ती 10 वर्षात 150 पर्यंत गेली. आता अंगणवाडी ते इयत्ता चौथी प्रत्येक वर्गात 30 विद्यार्थी आहेत. शाळेत 150 पैकी 98 विद्यार्थी परगावचे व बाकी खराशीचे आहेत आणि दरवर्शी नवे प्रवेश फक्त अंगणवाडीचेच आणि आता पुढच्या 3–4 वर्षातील प्रवेषासाठी विद्यार्थी प्रतिक्षेत आहेत. आता गेल्या काही वर्षापासून अशी स्थिती आलीय की शाळेला सुट्टी म्हटले की विद्यार्थी रडतात, कासावीस होतात. रोज शाळेत न चुकता, आनंदाने आणि मुख्य म्हणजे वेळेपूर्वीच येतात. मी आल्यापासून शाळेत घंटा नाही. 9.30 चा शाळेला विद्यार्थी 9 वाजताच हजर होतात. शिकतांना हेही विद्यार्थी कधी चुकतात, नाही असे नाही. परंतु, शासन निर्णय व परिपत्रक संकलन पुस्तिकेत (पा.क्र. 78) वाचल्याप्रमाणे "मुलांचे मूल्यमापन करत असतांना, योग्य शब्द वापरुन, त्यांना शिकण्यास प्रवृत्त करणे, शिकण्यासाठी मदत करणे असे असावे. त्यांच्या भावना दुखविणारे नसावे" याची जाणीव या शाळेतील शिक्षकांना आहे याची प्रचिती सरांच्या बोलण्यातून आली.

**2) प्रमुख आकर्षण काय** – रोज विद्यार्थ्यांशी नियमित संवाद साधणे, त्यांना नवनवे शिकण्यासाठी प्रवृत्त करणे, नवे शिकलेल्या गोष्टी, संकल्पनाची पुनरावृत्ती, सराव करणे, त्यांना अभ्यासात नवी माहिती शोधण्यात गुंतवणे, मोबाईल गुगल सर्च चा वापर करून नवी माहिती शोधणे, संकलित करणे, आपल्या सभोवती घडणाऱ्या दैनंदिन घटनांची दखल घेणे, त्यांचा आपल्याशी संबंध शोधणे, संकलित करणे, आपल्या सभोवती घडणाऱ्या दैनंदिन घटनाची दखल घेण, त्यांचा आपल्याशी संबंध शोधणे, आपल्यावर होणार परिणाम अनुभवणे, वाईट, अप्रिय घटनांची पुनरावृत्ती होवू नये म्हणून काय, कशी काळजी घेणे अशा तऱ्हेने दैनंदिन परिपाठाची आगळी वेगळी रचना करून प्रत्येक विद्यार्थ्याचा परिपाठात समावेश करणे, त्यांच्यावर जबाबदारी पेलण्याचे संस्कार करणे, त्यासाठी प्रेरित करणे या सर्वाचे फलित आपण सर्वांनी परिपाठात पाहिले. असेच त्यांच्या सहभागाचे स्वरूप आपण प्रत्येक वर्गातही पाहालच. उदाहरणा दाखल सांगतो काही दिवसांपूर्वी मला इयत्ता तिसरीला महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचा अभ्यास शिकवायचा होता. वेळ फार कमी होता. म्हणून मी वर्गातल्या प्रत्येक विद्यार्थ्याला एकेक जिल्हा वाटून दिला. प्रत्येकाला पुस्तकातून, गुगल सर्चच्या मदतीने माहिती गोळा करायला सांगितले. ती त्यांना चर्चेतून एकमेकांशी शेअर करायला सांगितली. सर्वांच्या सहभागाने कमी वेळात अभ्यास पूर्ण झाला. तोही मिळालेल्या माहितीचा आधीच्या माहितीशी संबंध जोडून. सर्वांनाच सभोवतालचे ऐकणे, पाहणे, त्यातून शिकणे षक्य झाले.

खरोखरच अप्रतिम! अतुल्य उपक्रम! विद्यार्थ्यांना संचयनीद्वारे बँकेचे व्यवहार षिकविणे, त्यात सर्व विद्यार्थ्यांना संधी देणे, त्यांच्यात स्वच्छता, शिस्त, समाजभान सक्रमित करणे, शाळेबद्दल, विद्यार्थ्यांबद्दल, शिक्षकांबद्दल येथील वस्तूंबद्दल, समाजाबद्दल आपलेपणाची भावना निर्माण करणे हेही अशाच अतुल्य उपक्रमातून शक्य होवू शकते. ह्याच विद्यार्थ्यांना पुढे माध्यमिक शाळेत असेच अनुभव मिळत गेले, समृद्ध करणारे शिक्षण मिळत गेले तर नक्कीच यातून पुढल्या स्पर्धात्मक परिक्षांसाठी, निरनिराळ्या जबाबदारीच्या पदांसाठी सुजाण विद्याथी तयार होतील.

**3) समाजाचा सहभाग कसा**–आमचे खराशी गाव लहानसेच पण एखादा प्रोजेक्ट त्यांच्यापुढे मांडला. त्याच्या यशातून गावाला, समाजाला, विद्यार्थ्यांना पालकांना होणारा फायदा उधश्त केला, तर गावातले सगळेच सहभागी होतात. उदाहरण दयायचे झाले तर ह्या शाळेची इमारत फक्त दोन खोल्यांची होती. त्याही गळक्या, पडीत झालेल्या. शाळेसाठी खोल्या बांधण्यासाठी शासनाकडून थोडीफार आर्थिक

मदत मिळाली. पण ती पुरेशी नव्हती. मग गावकऱ्यापुढे हे आव्हान ठेवले. ज्याला जसे जमेल तसे, जितकी जमेल तितकी मदत प्रत्येकाने केली. दोनच्या तीन, तीनच्या चार, हळुहळु करत आता 4 वर्ग खोल्या, अंगणवाडीची वेगळी खोली, स्वयंपाकाची, सांस्कृतिक कार्यक्रमाला आणि रिसोर्स साठी अशा पुरेशा खोल्या बांधता आल्या. शाळेच्या संरक्षक भिती (कंपाऊंड वॉल) चेही तसेच! फक्त या सुरक्षित भिंतीची डिझाईन किल्ल्याच्या भिंतींसारखे वाटावे ही माझी कल्पना! पण खर्च मात्र नागरिकांच्या देणगीतून, सहभागातून शक्य झाला. नुसते इतकेच नाही, या नागरिकांचा, या विद्यार्थ्यांच्या पालकांचा उत्साह, सहभाग एवढा की, या पालकांसाठी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारी संध्याकाळी शाळा भरते. आपली मुले काय शिकतात? कसे शिकतात? याचे ज्ञान या पालकांना या शुक्रवारच्या शाळेतून मिळते. सगळे मिळून सर्व कामे करतात. या विद्यार्थ्यांनी तर आपल्या आई–वडिलांना, वडिलधाऱ्यांना सह्या करायला शिकविले, व्यसनातून सोडविले.

**4) आणखी शाळेची काही वैशिष्ट** – विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून मिळावे; विद्यार्थ्यांना शिकविण्यापेक्षा त्यांना स्वतःहून शिकण्यास प्रवृत्त करावे ही जपान, फिनलॅन्डची पद्धती आहे. शाळेतील शिक्षक दीप स्तंभासारखे असतात. कुटूंबीयांनीही मुलांच्या शिक्षणाप्रती आपली जबाबदारी ओळखावी व स्वीकारावी. शाळा, विद्यार्थी, पालक, शिक्षक, समाज सर्वांनीच येणाऱ्या अडचणींना अडचणी न समजता प्रेरणा, आव्हान समजून कार्य केले तर ते नक्कीच यशस्वी होते. या विद्यार्थ्यांनी दररोज कमीत कमी एक तास तरी वाचन करणे अनिवार्य असते. ते ही विद्यार्थ्यांच्या पालकांद्वारे पाहणी (मॉनीटर) होते. शाळेतील असे हे विद्यार्थी घरी आपल्या पालकांसोबत इंग्रजी मधून संवाद करतात. नागपूर, चंद्रपूरच्या काही शाळांनी आमच्या अनुभवांचा, शाळेत राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पाचा, कृतीचा चांगला उपयोग त्यांच्या शाळांमध्ये करून घेतला आहे.

**5) पुढे काय** – इयत्ता 4 थी पास झाल्यानंतर पुढे काय? अशाच प्रकारचे शिक्षण त्यांना मिळावे म्हणून काही प्रयत्न. माझी मुलगी खराशीच्या याच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतून पास झाली. पुढचे शिक्षण तिला याच गावातील शाळेत द्यायचे हे ठरवून मी तिला शेजारच्या, जवळच्याच माध्यमिक शाळेत घातले. त्या शाळेतील मुख्याध्यापकांना आमच्या शाळेला भेट देण्याविषयीचे आमंत्रण दिले. शाळा भेटीत त्यांनी ज्या ज्या उल्लेखनीय, प्रशंसनीय गोष्टी अनुभवल्या, त्या सर्वांचा समावेश त्यांच्या माध्यमिक शाळेच्या परिपाठात करून तेथील विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण केली. यंदाची 10 वी पास होणारी पहिलीच बॅच! त्यात 2 मुले मंडळाच्या निकालानुसार मेरिट मध्ये आली. माझी मुलगी 9 वीत आहे. पुढील वर्षी तीही मेरिट मध्ये 10 वी पास होईल असा मला विश्वास वाटतो. पुढे याच शाळेतील मुले आय.ए.एस., आय.पी.एस. सारख्या स्पर्धात्मक परिक्षांत उज्वल यश घेवून पास होतील, हे दिसले तर नवल वाटायला नको.

**समारोप (शाळेचे मूल्यमापन)** :– अनुकुल (Friendly) वातावरण शिकण्यासाठी पोषक ठरते. चाकोरी बाहेरील शिक्षणामुळे, विद्यार्थ्यांना रूचेल, पचेल असे शिक्षाण दिल्यामुळे शिकणे आनंददायी होते. याचा अनुभव प्रत्येक वर्ग भेटीत सर्वच अभ्यासगतांना आला. त्यांचे होणारे सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन, त्यांची वर्गातील शिस्त, स्वच्छता, स्वतःहून जबाबदारीने खोलीतील वस्तू पुसून, धूळ बसू न देता त्यांना योग्य तऱ्हेने हाताळीत, कशा वापरतात याचा प्रत्यक्ष अनुभव आला. विद्यार्थ्यांची जेवणाच्या सुटीतील शिस्त, स्वच्छता, स्वतःचे ताट धुवून ठेवण्याची जबाबदारी सर्वच काही प्रशंसनीय होते. एका आगळ्यावेगळ्या शाळेला भेट दिल्याचे, काही नविन करण्याजोग्या प्रयत्नांचे अनुभव अद्भूत होते. ज्ञानरचनावादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकण्यास प्रेरित करण, स्वतः शिकण्याची संधी देणे, त्यातून शिकलेले संस्कार कधीच न मिटणे आणि तेथील विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये वृद्धिंगत झालेल्या गुणवत्तेची पाहणी सार्थ, यथार्थ आहे हे जाणवले. खराशी सारख्या इतरही ठिकाणच्या शाळांची, तेथील विद्यार्थ्यांची अशी प्रगती होतांना पाहून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचे स्वप्न लवकरच सत्यात उतरेल. सतत हसत खेळत चैतन्यपूर्ण वातावरणात शिकणारे विद्यार्थी चटकन व्यक्त होतील; त्यांना खूप आनंदित करतील यात काही शंकाच नाही.

असे असले तरी या शाळेतले सर्व विद्यार्थी खेळात सहभागी होतात काय? वरचेवर आजारी पडतात काय? शाळेला कोणत्या सेवाभावी संस्थेची मदत मिळते काय? मुख्याध्यापकाच्या अनुपस्थितीत सगळे असे घडते काय? हे आणि आणखी कितीतरी प्रष्न सखोल संशोधनाचा विषय ठरतील.

***संदर्भ :***

*1) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र : महाराष्ट्र शासन : शासन निर्णय व परिपत्रक संकलन पुस्तिका (2016–17), जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संख्या, लोणी काळभोर, ता. हवेली, जिल्हा पुणे, (पष्क्र. 78)*
*2) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय 22 जून, 2015*
*3) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय 16 सप्टेंबर, 2016*
*4) जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम 9 जानेवारी, 2017*
*5) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय 17 जानेवारी, 2017*
*6) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय 21 जून, 2017*
*7) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अहवाल डिसेंबर, 2018 अखेर*
*8) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अध्ययन निष्पत्ती प्राथमिक स्तर– मार्गदर्शिका प्रथम आवृत्ती डिसेंबर, 2017*
*9) "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" क्रांतीकारी शैक्षणिक कार्यक्रम जीवन शिक्षण मासिक (जून जुलै, 2016)*
*10) मुलांचे शिक्षण : पालक व शासन, लेखक : प्रा. रमेश पानसे*
*11) प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र : विकास व अध्ययन – संजीव सोनवणे, निराली प्रकाशन पुणे, (2015)*
*12) स्पर्धात्मक कौशल्य– अरविंद चौधरी, प्रकाशक– प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव (2011)*